follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd No.72105/99 ✻ वर्ष २५ ✻ अंक २८१ ✻ सातारा ✻ सातारा रविवार दि. २३ जून २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

## लोकसभेच्या निकालानंतर भाजपला मोठा धक्का

### माजी मंत्री सूर्यकांता पाटील यांचा पक्षाला रामराम



**मुंबई :** माजी केंद्रीय राज्यमंत्री आणि हिंगोली लोकसभेच्या माजी खासदार सूर्यकांता पाटील यांनी अखेर भाजपला रामराम ठोकला आहे. सूर्यकांता पाटील यांनी पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा तसेच हदगाव विधानसभा संयोजक पदाचा राजीनामा दिला आहे. सूर्यकांता पाटील यांच्या राजीनाम्यामुळे भाजपलाहिंगोलीव नांदेड जिल्ह्यात मोठा धक्का बसला आहे. सूर्यकांता पाटील यांनी त्यांचा राजीनामा जिल्हाध्यक्ष ॲड.किशोर देशमुख यांच्याकडे सुपूर्द केला. गेल्या अनेक दिवसांपासून सूर्यकांता पाटील यांनी आपली परखड मते व्यक्त केली होती. त्यानंतर आता पाटील यांनी पक्षाचा राजीनामा दिला आहे.

सूर्यकांता पाटील यांनी चार वेळा खासदार, एक वेळा आमदार म्हणून हिंगोली-नांदेड मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. आपण आपला राजीनामा स्वखुशीने देत असल्याचे सूर्यकांता यांनी स्पष्ट केलं आहे. अशोक चव्हाण यांच्याभाजपाप्रवेशानंतर सूर्यकांता पाटील यांनी परखड मत व्यक्त केले होते. अशोक चव्हाणांमुळे भाजपाचा पराभव झाला नाही. उलट भाजपत येऊन अशोक चव्हाण यांनी स्वतःच नुकसान करून घेतलं, असे विधान पाटील यांनी केलं होतं.

काय म्हटलंय राजीनामा पत्रात? मी माझ्या प्राथमिक सदस्यत्वाचा तथा माझ्या हदगाव विधानसभा संयोजक पदाचा राजीनामा देत आहे. आपल्या सोबत गेल्या १० वर्षात खूप काही शिकता आले. तालुक्यात बुथ कमीटीपर्यंत काम केले. आपण दिलेल्या संधीसाठी मी आपली व भारतीय जनता पार्टीची अत्यंत आभारी आहे. मी आपला निरोप घेत आहे. प्रत्यक्ष भेटीचा प्रयत्न केला पण आपल्या व्यस्ततेमुळे ते शक्य झाले नाही. कोणतीही कटुता मनात न ठेवता राजीनामा देत आहे तो स्विकारावा हि नम्र विनंती' असे या राजीनामा पत्रात म्हटलं आहे. १९७२ मध्ये भाजप महिला आघाडी प्रमुख म्हणून सूर्यकांता पाटील यांनी त्यांचा राजकीय प्रवास सुरु केला होता. त्यानंतर त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करुन नगरसेवक ते खासदार अशी पदे भूषवली. त्यानंतर पाटील या राष्ट्रवादी काँग्रेससोबत गेल्या. यानंतर २०१४ साली त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता.

## शक्तीपीठ महामार्ग कोणाच्या कल्याणासाठी

### काँग्रेस आक्रमक : विरोधी कृती समितीसह रस्त्यावर उतरणार

**सांगली :** नागपूर ते गोवा शक्तीपीठ द्रुतगती राज्य महामार्ग हा अनावश्यक लादला जातोय. रत्नागिरी-नागपूर राष्ट्रीय महामार्गाला समांतर रस्ता कुणाच्या कोटकल्याणासाठी केला जातोय? तो स्थगित करण्याची घोषमा भ्रम निर्माण करणारी आहे. तो रद्द झालाच पाहिजे, अशी मागणी करत आज काँग्रेस नेत्यांनी आक्रमक भूमिका घेतली. महामार्ग विरोधी कृती समितीला काँग्रेसने जाहीर पाठींबा दिला.

जिल्हाधिकारी कार्यालयात उद्या (ता. २२) होणाऱ्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीवेळी आम्ही सर्वपक्षिय आमदारांना अडवू. त्यांना शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्याची मागणी करायला लावू, त्यानंतरच आत सोडू, असा इशारा यावेळी देण्यात आला. जिल्हा नियोजन समितीत महामार्ग रद्दचा ठराव घ्या, अशी मागणीदेखील करण्यात आली.




माजी केंद्रीय राज्यमंत्री प्रतीक पाटील, आमदार विक्रम सावंत, काँग्रेसचे शहराध्यक्ष पृथ्वीराज पाटील, जिल्हा बँक उपाध्यक्षा श्रीमती जयश्री पाटील, कृती समितीचे उमेश देशमुख, सतीश साखळकर, दिगंबर कांबळे, भूषण गुरव आदी उपस्थित होते.

प्रतीक पाटील म्हणाले, ''शक्तीपीठ महामार्ग कशासाठी करताय? हा समांतर रस्ता कुणाच्या विकासासाठी केला जातोय? शेती पूर्ण उद्धस्त करून रस्ते बांधणे योग्य आहे का? आम्ही ज्या मार्गांची गरज आहे, त्याच्या पाठीशी आहोत, विकास गरजेचा आहे. जतमध्ये चांगले रस्ते करा. दुष्काळी भाग चांगल्या रस्त्यांनी जोडा. शक्तीपीठसारखा समांतर रस्ता अनावश्यक आहे आणि तो रद्दच झाला पाहिजे.

आमदार विक्रम सावंत म्हणाले, ''कुणीतरी रात्री स्वप्नात एक रस्ता पाहिले आणि सकाळी उठून जाहीर केला, असे शक्तीपीठचे झाले आहे. गरज नसताना महामार्ग बांधून शेतकऱ्यांना भूमीहीन करू नका, काँग्रेस हे होऊ देणार नाही.''

पृथ्वीराज पाटील म्हणाले, ''भूसंपादनाला स्थगिती हे ढोंग आहे, रस्ता रद्द झाला पाहिजे. जिल्ह्यातील १३०० एकर शेती त्यामुळे उद्धस्त होणार आहे. समृद्धी महामार्गाने एक विधानसभा निवडणुकीचा खर्च तुम्ही काढला, शक्तीपीठच्या माध्यमातून सरकार २०२४ च्या निवडणूक खर्चाची तयारी करते आहे का?''

जयश्री पाटील म्हणाल्या, ''शक्तीपीठ महामार्गाला स्थगिती नकोय, तो रद्द झाल्याची घोषणा होईपर्यंत काँग्रेस लढत राहणार आहे.''

उमेश देशमुख म्हणाले, ''या महामार्गाने सांगलीला महापुराचा मोठा फटका बसणार आहे. सांगली शहर आणि अनेक गावे त्यात बुडतील. त्यामुळे जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात हरकती दाखल झाल्या पाहिजेत.''

सतीश साखळकर म्हणाले, ''जिल्ह्यातील १३०० एकर शेती आणि ५३७० शेतकरी बाधित होणार आहेत. काही नेते तोंडी स्थगितीची घोषणा करताहेत, मात्र आम्ही रस्ता रद्द झाल्याची अधिसूचना निघाल्याशिवाय गप्प बसणार नाही. आगामी विधानसभेला याचे परिणाम भोगावे लागतील.'' प्रा. सिकंदर जमादार आदी उपस्थित होते.

**पुलांचे जाळ अन् महापुराला निमंत्रण**

प्रतीक पाटील यांनी कृष्णा नदीवर पुलांचे जाळे विणले जात असून ते महापुराचे मोठे कारण ठरणार असल्याची टीका केला. त्यावर पृथ्वीराज पाटील यांनी आमदार सुधीर गाडगीळ यांच्या हट्टामुळे आयर्विनला समांतर आणि हरिपूर-कोथळी हे अनावश्यक पूल झाल्याची टीका केली.

## राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ४६% वरून ५०% होणार ! 'या' तारखेला निघणार जीआर

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीच्या आधी केंद्रातील मोदी सरकारने केंद्रीय कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ४६ टक्क्यांवरून ५०% केला आहे. मार्च महिन्यात केंद्रातील सरकारने हा निर्णय घेतला. या निर्णयानुसार केंद्रीय कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता जानेवारी २०२४ पासून ४६ टक्क्यांवरून ५०% झाला आहे.

अर्थातच महागाई भत्त्यात चार टक्क्यांची वाढ झाली आहे. केंद्रातील सरकारने हा निर्णय घेतल्यानंतर देशातील अनेक राज्य सरकारांनी तेथील राज्य कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता वाढवला आहे. मात्र महाराष्ट्र राज्य शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता अजून वाढलेला नाही.

यामुळे जानेवारी २०२४ पासून राज्य कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता कधी वाढणार? हा मोठा सवाल उपस्थित केला जात आहे. दरम्यान याच संदर्भात आता एक मोठी अपडेट समोर आली आहे.

लोकसभा निवडणुकीच्या आधी केंद्रातील मोदी सरकारने केंद्रीय कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ४६ टक्क्यांवरून ५०% केला आहे. मार्च महिन्यात केंद्रातील सरकारने हा निर्णय घेतला. या निर्णयानुसार केंद्रीय कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता जानेवारी २०२४ पासून ४६ टक्क्यांवरून ५०% झाला आहे.

अर्थातच महागाई भत्त्यात चार टक्क्यांची वाढ झाली आहे. केंद्रातील सरकारने हा निर्णय घेतल्यानंतर देशातील अनेक राज्य सरकारांनी तेथील राज्य कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता वाढवला आहे. मात्र महाराष्ट्र राज्य शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता अजून वाढलेला नाही.

यामुळे जानेवारी २०२४ पासून राज्य कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता कधी वाढणार? हा मोठा सवाल उपस्थित केला जात आहे. दरम्यान याच संदर्भात आता एक मोठी अपडेट समोर आली आहे.

तथापि ही महागाई भत्ता वाढ जानेवारी महिन्यापासून लागू राहणार असल्याने जानेवारी ते मे या कालावधीमध्ये महागाई भत्ता फरकाची रक्कम देखील राज्य कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे.

एकंदरीत जून महिन्याच्या अखेरीस राज्य कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५० टक्के करण्याबाबतचा अधिकृत शासन निर्णय म्हणजे जीआर जारी होण्याची शक्यता आहे. यामुळे राज्य कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळेल अशी आशा आहे.

याशिवाय या पावसाळी अधिवेशनात राज्य कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय वाढवण्याबाबतही सकारात्मक निर्णय होऊ शकतो असा दावा केला जात आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबत राज्य सरकार सकारात्मक निर्णय घेणार असे म्हटले आहे. यामुळे संपूर्ण महाराष्ट्राचे आगामी पावसाळी अधिवेशनाकडे लक्ष लागलेले आहे.

## महायुतीत फूट? अजितदादांनी प्रकाश आंबेडकरांबरोबर जावे

### पक्षाच्या प्रवक्तयाचाच जाहीर सल्ला

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीत महायुतीला बसलेल्या फटक्याचं खापर अजितदादांच्या राष्ट्रवादीवर फोडले जात असून, महायुतीत अजितदादांचे खच्चीकरण होत आहे. त्यामुळे त्यांनी आता प्रकाश आंबेडकरांसोबत जावं असे विधान अजित पवारांचे विश्वासू आमदार अमोल मिटकरी यांनी केले आहे. हे आपलं वैयक्तिक मत असलं तरी पक्षानं यावर विचार करण्याची मागणी त्यांनी केली आहे. एका वृत्तवाहिनीशी बोलताना मिटकरी यांनी वरील विधान केले आहे.

अजितदादांना महायुतीत एकटं पाडण्याचा प्रयत्न होत असून, काहीही करून त्यांनी महायुती सोडावी यासाठी दोन्ही मित्र पक्षातील काही लोक प्रयत्न करत आहेत, असा गंभीर आरोपही मिटकरी यांनी केला आहे.

अजितदादांनी महायुतीतून बाहेर पडावे यासाठी काहीजण मानसिक खच्चीकरण करण्याचाही प्रयत्न करत असल्याचे ते म्हणाले. अजित पवार आणि प्रकाश आंबेडकर एकत्र आले तर विधानसभा निवडणुकीत हे दोन्ही नेते महाराष्ट्राचं राजकारण बदलवून शकतील असा विश्वासह मिटकरी यांनी बोलताना व्यक्त केला आहे.

## मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता आमदारकीचं काय घेऊन बसलाय?

**भुजबळांचे जरांगेंना प्रत्युत्तर**

**मुंबई :** छगन भुजबळ यांचं करिअर उद्धस्त करू. त्यांनी आमच्या वाटेला जाऊ नये, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांच्याकडून दिला जात आहे. मनोज जरांगे पाटील यांचा हा इशारा राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी उडवून लावला आहे. मी मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. आमदारकीचं काय घेऊन बसलाय?, अशा शब्दात छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे पाटील यांचा इशारा उडवून लावला आहे. मराठ्यांवर अन्याय



करा असं आम्ही म्हटलं नाही. त्यांना सेपरेट आरक्षण द्या असं सांगितलं. सारथीच्या माध्यमातून मराठा विद्यार्थ्यांना सर्वाधिक सुविधा आहेत. आमचा त्याला विरोध नाही. आणखी काय पाहिजे? घरेही सरकार देत आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवत आहे. कर्ज माफीच्या योजना आणत आहोत. विद्यार्थ्यांची फी देत आहोत. शहरात शिकणाऱ्यांना वसतिगृह देणं, वसतिगृहाची सुविधा देता येत नसेल तर ६० हजार रुपये देणं या गोष्टी सरकार सर्वांसाठी करत आहे. मग अडचण काय आहे?, असा सवाल भुजबळ यांनी केला.

## अखेर १० दिवसांनंतर हाके, वाघमारेंचे उपोषण स्थगित; पण



**जालना :** वडीगोद्रीमध्ये ओबीसी समाजांच्या मागण्यासाठी प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांनी बेमुदत उपोषण सुरू केले होते. अखेर १० दिवसांच्या उपोषणानंतर त्यांनी राज्य सरकारच्या शिष्टमंडळाच्या भेटीनंतर हे उपोषण मागे घेतले. या भेटीदरम्यान ओबीसी समाजाचे नेते आणि अजित पवार गटाचे मंत्री छगन भुजबळ यांनी आक्रमक पवित्रा घेत ओबीसी समाजाच्या राजकीय आरक्षणाची मागणी केली. गेल्या ९ दिवसांपासून लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे आणि त्यांचे सहकारी अंबड तालुक्यातील वडीगोद्री गावात ओबीसी आरक्षणांच्या मागणीसाठी उपोषण करत होते.

## कोणाच्या ताटातलं काढून इतरांना देऊ नये; मराठा- ओबीसी संघर्षावर राऊतांचं वक्तव्य



**मुंबई :** ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी आज माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी अनेक विषयांवर भाष्य केलं. नीट परीक्षांबद्दलही त्यांनी केंद्र सरकारकडे मागणी केली. तर मराठा आणि ओबीसी समाजांमध्ये सुरू असलेल्या संघर्षावरही भाष्य केलं.

मुंबई: ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी आज माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी अनेक विषयांवर भाष्य केलं. नीट परीक्षांबद्दलही त्यांनी केंद्र सरकारकडे मागणी केली. तर मराठा आणि ओबीसी समाजांमध्ये सुरू असलेल्या संघर्षावरही भाष्य केलं.

संजय राऊत म्हणाले की, महाराष्ट्रात आरक्षणावरून संघर्ष सुरूच आहे. लक्ष्मण हाके असोत किंवा मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणारे, मनोज जरांगे दोघेही म्हणतात आमचा सरकारवर विश्वास नाही. मराठा समाज आणि ओबीसी समाज एकमेकांविरुद्ध उभे आहेत, ते राज्याच्या सुरक्षेच्या आणि शांततेच्यादृष्टीने योग्य नाही. कोणाच्या ताटातलं काढून देऊ नये ही ठाकरे गटाची भूमिका असल्याचं राऊत यांनी स्पष्ट केलं.

सरकारमधील मंत्री आणि नेत्यांची शिष्टमंडळे उपोषणाला बसलेल्या लोकांची वेळोवेळी भेट घेत आहेत. मात्र, उपोषणकर्त्यांकडून त्यांचे प्रस्ताव फेटाळले जात आहेत. शिष्टमंडळ जाऊन उपोषणकर्त्यांकडे हा प्रश्न सुटणार नाही कारण कोणत्याही समाजाचया नेता आणि उपोषणकर्ता सरकारवरती विश्वास ठेवायला तयार नाही. नेत्यांचा सरकारवर विश्वास नसेल तर अशा वेळेस सर्वपक्षीय शिष्टमंडळ किंवा सर्वपक्षीय समिती सर्वपक्षीय चर्चा हाच एक मार्ग आहे. दोन्ही बाजूच्या लोकांशी बोलून मध्यममार्ग काढणे ही सरकारची जबाबदारी आहे. नुसती वक्तव्ये आणि पोकळ आश्वासने देऊन चालणार नाही, असंही राऊत म्हणाले.

पेपरफुटीवरील कायद्यावर राऊत म्हणाले, पेपर लीक विरुद्ध कायदा, भ्रष्टाचार विरुद्ध कायदा, दहशतवादाविरुद्ध कायदा असे अनेक कायदे देशात निर्माण झाले आहेत. पण गेल्या दहा वर्षांत एकही कायदा धड अमलात आला नाही. फक्त पी एम एल ए कायदा अंमलात आला. पीएमएमए कायद्याचा व्यवस्थित वापर आपल्या राजकीय विरोधकांच्या विरोधात झाला.

## उद्धव ठाकरेंच्या भेटीनंतर लंकेंचा निर्धार



**मुंबई :** निलेश लंके हे मुंबई दौऱ्यावर आहेत. या मुंबई दौऱ्यादरम्यान, निलेश लंके यांनी उद्धव ठाकरेंची भेट घेतली. या भेटीनंतर निलेश लंके यांनी माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले की, 'बाळासाहेब ठाकरे यांचं एक वाक्य आठवतं. ८० टक्के समाजकारण, २० टक्के राजकारण बाळासाहेब ठाकरेंची प्रेरणा घेऊन राजकारणाचा प्रवास सुरु केला होता. शिवसेनेत शाखाप्रमुख, गटप्रमुख, तालुकाप्रमुख असे पद भूषवलं. मी खासदार झाल्याने उद्धव ठाकरेंनाही आनंद झाला. विधानसभा निवडणुकीत नगरच्या १२ पैकी १२ जागा निवडून आणण्याचा निर्धार केला आहे. या संदर्भात ठाकरेंशी देखील बोललो आहे'

'महाविकास आघाडीच्या एवढ्या जागा निवडून आल्या. त्याचा त्यांना खूप आनंद झाला आहे. उद्धव ठाकरेंना व्यग्र कामांमुळे नगरमध्ये प्रचाराला येता आलं नाही. मात्र, आदित्य ठाकरे आणि इतर नेत्यांनी माझा प्रचार केला. विधानसभा किंवा मेळावा होईल, त्यावेळी पहिला मेळावा नगरमध्ये घेऊ असं त्यांनी मला सांगितलं आहे, असे लंके म्हणाले.

## राज्यातील सर्व मोठ्या प्रकल्पांच्या खर्चाची चौकशी करा, खासदार सुप्रिया सुळे यांची मागणी



**पुणे :** अटल सेतूला पडलेल्या भेगा मी पाहिल्या. केवळ या सेतूच्या कामाचीच नाही, तर राज्य सरकारने केलेल्या सर्वच मोठ्या खर्चाच्या प्रकल्पांची चौकशी व्हावी, अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी पुण्यात केली. खासदार म्हणून विजयी झाल्यानंतर सुळे यांनी प्रथमच पक्ष कार्यालयाला शनिवारी भेट दिली. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, शहराध्यक्ष प्रशांत जगताप या वेळी उपस्थित होते.

पत्रकारांशी बोलताना खासदार सुळे म्हणाल्या, की अटल सेतूचे काम निकृष्ट असल्याचे समोर आले आहे. या सरकारने घाईने कोट्यवधींचे प्रकल्प केले. त्याचा हा परिणाम आहे. या सरकारने केलेल्या अशा सर्वच मोठ्या कामांची चौकशी लावायला हवी. राज्यात पेपरफुटी झाली, शेतकऱ्यांना फसविण्यात आले, बेरोजगारांना काम मिळत नाही, महिलांवर अत्याचार होत आहेत. अशी कोणती गोष्ट आहे, की त्यावर हे सरकार चांगले काम करत आहे? मुलींना विनामूल्य शिक्षण या विषयावर पालकांनी रस्त्यावर येऊन आंदोलन करावे, मी स्वतः त्यात सहभागी होईन. मुलींना विनामूल्य शिक्षण ही घोषणा राज्य सरकारने निवडणुकीपूर्वी केली. त्याचे पुढे काहीच झाले नाही. सर्व पालकांना पैसे जमा करावेच लागले.

राज्यातील जातीय संघर्षाला हेच सरकार जबाबदार आहे. केंद्राने जनगणनाच केली नाही. ती झाली नाही म्हणून समोर कसलीही आकडेवारी नाही. मग कशाच्या आधारावर आरक्षण जाहीर केले जाते. घटनेत दुरुस्ती हा केंद्राच्या अखत्यारितील विषय आहे. यापूर्वी सरकार त्यांचेच होते, आता संख्या कमी झाली, तरीही त्यांचेच सरकार आहे. पण ते दुरुस्ती करत नाहीत. कारण त्यांना भांडणेच लावायची आहेत, असेही सुळे यांनी या वेळी सांगितले.

## संपादकीय

# उसवली वीण सारी

सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाची मर्यादा घालून दिली आहे. या मर्यादेच्या पुढे आरक्षण गेले, तर ते टिकत नाही, हे वारंवार अनुभवायला आले आहे. असे असताना राजकीय पक्ष आरक्षणाच्या मुद्याला खतपाणी घालतात आणि आम्ही आरक्षण दिले होते, विरोधकांना ते टिकवता आले नाही, अशी सोईची ओरड करतात. ज्याला मर्यादा आहेत आणि जे देणे शक्य नाही, अशांची आश्वासने द्यायची, मतपेढीचा फायदा घ्यायचा अशी राजकीय पक्षांची रीत आहे. वास्तविक संबंधित समाजघटक आरक्षणासाठी रस्त्यावर का आला याच्या मुळाशी जाऊन विचार करायला हवा. मराठा, धनगर, लिंगायत, मुस्लिम, पाटीदार, मीना आदी समाज आर्थिक परिस्थितीमुळे तसेच अन्य समाजघटकांतील विद्यार्थ्यांना आणि युवकांना ज्या सवलती मिळतात, त्या आपल्याला मिळत नाहीत, त्यामुळे आपली मुले मागे पडतात, त्य़ांना रोजगार मिळत नाही, या अस्वस्थतेतून आरक्षणासाठी रस्त्यावर उतरला आहे. अशा पार्श्वभूमीवर सामाजिक व आर्थिक मागासलेपण लक्षात घेऊन शिक्षणासाठी तसेच संबंधित समाजघटकांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी सरकारने मदतीचा हात दिला, तर आरक्षणाची गरज भासणार नाही; परंतु आरक्षण आंदोलनातील तीव्रता कमी करण्यासाठी आश्वासनांचा पाऊस पाडायचा आणि वेळ निभावून न्यायची, यावर राज्यकर्त्यांचा भर असतो. मराठा आंदोलक तसेच धनगर समाजाला दिलेली आश्वासने याच धाटणीची होती. सरकारने दिलेला शब्द पाळला नाही, तर तो विसरून जाण्याची आणि सरकारची कोंडी करायची असे पूर्वी होत नव्हते. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनापासून ते सुरू झाले. सरकारने मागितलेल्या दिवसांपेक्षा जास्त मुदत द्यायची आणि त्या मुदतीत आश्वासनपूर्तीझाली नाही, की पुन्हा रस्त्यावर येण्यामुळे जरांगे पाटलांनी अख्खा महाराष्ट्र हलवला. छगन भुजबळ य़ांच्यावर एकेरीत केलेली टीका, देवेंद्र फडणवीस यांना पाडण्याची भाषा गैर असली, तरी जरांगे पाटील यांना दिलेला शब्द न पाळण्यातून त्यांचा कडवटपणा आला आहे, हे ध्यानात घ्यावे लागेल. प्रा. लक्ष्मण हाके काहीही म्हणत असले, तरी मराठा आंदोलनाचा मोठा परिणाम मराठवाड्यासह लगतच्या जिह्यात झाला हे विसरून चालणार नाही. त्यामुळे सामाजिक वीण उसवली. बीड जिल्ह्यात मराठा आणि वंजारी समजात मोठी दरी निर्माण झाली. परस्परांवर बहिष्कार टाकण्याची भाषा झाली. काही ठिकाणी हाणामाऱ्या झाल्या. मराठा आणि ओबीसी समाज एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून काम करणारा होता. रोटी-बेटी सोडली, तर अन्य सर्व व्यवहारांत ते एकमेकांचे साथीदार होते. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याचा, सगेसोयऱ्यांच्या आरक्षणाचा मुद्दा मान्य करणारे आता उलटले आहेत. मराठा समाजाची कुणबी प्रमाणपत्रे निघत असताना ती बोगस असल्याचा सरसकट आरोप करून त्यांच्याही ओबीसीतील समावेशाला विरोध करणे म्हणजे रेल्वेच्या डब्यात शिरल्यानंतर गर्दीचे कारण सांगून बाहेरच्यांना आत न येऊ देण्यासारखे आहे.

मराठा समाजाला यापूर्वी दिलेले आरक्षण टिकले नाही. आता दहा टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला, तरी बिहारचे उदाहरण लक्षात घेता तो ही निर्णय टिकण्याची शक्यता नाही. त्यामुळे जरांगे पाटील ओबीसीतूनच आरक्षण देण्याचा हट्ट का करीत आहेत, हे लक्षात यायला हरकत नाही. ओबीसी समाजही मराठा आरक्षणाला विरोध करण्यासाठी रस्त्यावर आला आहे. त्यामुळे आता या दोन्ही समाजांत कमालीचा दुरावा, दुही निर्माण झाली आहे. शहरांत त्याचा परिणाम एवढा जाणवणार नाही; परंतु ग्रामीण भागात तो जाणवतो. समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक उन्नतीचा आरक्षण हाच एकमेव मार्ग नाही. शिवाय नोकरीसाठी विचार केला, तर सरकारी नोकऱ्यांचे प्रमाण एक टक्काही राहिलेले नाही. १७ हजार जागांसाठी १७ लाख अर्ज येत असतील, तर बेरोजगारीची समस्या किती मोठी आहे, हे लक्षात येईल. आरक्षणामुळे तरी आपल्या पाल्याला नोकरी मिळेल, अशी आशा मराठा समाजाला जशी वाटते, तशीच ती धनगर समाजालाही आदिवासीत समावेशामुळे मिळेल, असे वाटते; परंतु हे मृगजळ आहे हे दुर्दैवाने महाराष्ट्रातील कुणीही विचारवंत कोणत्याही समाजाला आणि त्यांच्या नेत्यांना सांगायला पुढे येत नाही. नेता सर्व समाजाचा असला पाहिजे; परंतु त्यांच्याही आता जातीच्या उतरंडी लागल्या आहेत. राज्याच्या, समाजाच्या अधोगतीचे हे लक्षण आहे. बिहारमध्ये अनुसूचित जाती, जमाती, ईबीसी आणि ओबीसीचे आरक्षण १५ टक्क्यांनी वाढवण्याचा राज्य विधिमंडळाने घेतलेला निर्णय पाटणा उच्च न्यायालयाने रद्द केला. महाराष्ट्रातही मराठा आरक्षणाच्या निर्णयावर आलेल्या हरकती, उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका आदी पाहता आरक्षण न देताही सामाजिक मागासलेपण आणि आर्थिक स्थिती दूर करण्यासाठी काय उपाय करता येतील हे पाहायला हवे. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी सुरू केलेले उपोषण काही आश्वासनांवर जरांगे पाटील यांनी मागे घेतले असले, तरी मराठा समजाला आरक्षण देताना ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लावणार नाही, असे लेखी देण्याच्या मागणीसाठी प्रा.हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी सुरू केलेले उपोषण अजून सुरूच आहे. हाके आणि जरांगे यांच्या भूमिकांमुळे पुन्हा एकदा मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष राज्यात उभा राहिला आहे. दोघांनी एकमेकांवर अगदी खालच्या पातळीवर जाऊन टीका केली आहे. सामाजिक प्रश्न राहिले बाजूला, दोघातील हमरी-तुमरीचे स्वरुप येणे चांगले नाही.

जरांगे यांनी वारंवार सग्यासोयऱ्यांच्या आरक्षणाचा आणि मातृ-पितृसत्ताक सगेसोयऱ्यांचा आग्रह धरला आहे. ज्येष्ठ विधिज्ञ उज्वल निकम यांनीही सगेसोयऱ्याची व्याख्या आई आणि वडील असे दोन्हीकडील नातेवाइक अशी केली होता.राज्यघटनेला लिंगभेद मान्य नाही; परंतु सरकार मातेकडील ओबीसी प्रमाणपत्रे ग्राह्य धरायला तयार नाही. ज्यांची ओबीसी प्रमाणपत्रे सापडली, त्यांना ओबीसी आरक्षण द्यायला कायद्यानेही विरोध करता येणार नाही, हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. अशा वेळी हाके, छगन भुजबळ, विजय वडेट्टीवार, पंकजा मुंडे यांच्या विरोधालाही काही अर्थ राहत नाही. मराठा समाजाला ओबीसीतील सरसकट समावेशाला आणि ओबीसीच्या खोट्या प्रमाणपत्रांना ते विरोध करू शकतात. मराठा कुणबी एकच हा कायदा मंजूर करण्याची जरांगे यांची मागणी आहे. ती पूर्ण करणे सरकारला ओबीसींच्या विरोधामुळे शक्य होणार नाही. जरांगे आंदोलन करतात; परंतु ते तुटेपर्यंत ताणत नाही. हाके आणि वाघमारे यांच्या उपोषणातून मात्र मार्ग निघायला तयार नाही. त्यामुळे तर सरकार जरांगे यांच्यापुढे झुकते आणि ओबीसींकडे दुर्लक्ष करते, अशी टीका केली जाते. भुजबळांनी आंदोलनात उतरण्याच्या दिलेल्या इशाऱ्याचा सरकारवर फारसा परिणाम झालेला नाही.

ड. प्रकाश शेंडगे यांनी आतापर्यंत सरकारला भरपूर इशारे दिले, त्याची दखल घेतली गेली नाही. राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनी मात्र ओबीसींच्या

# वटपौर्णिमेस वृक्षारोपण करून पाटण प्रशासनाने दिला अनोखा संदेश

## प्रांत सुनिल गाढे, तहसिलदार अनंत गुरव यांनी केले वृक्षारोपण

**पाटण :** पाटण प्रशासनात काम करणारे अधिकारी प्रांताधिकारी सुनिल गाढे व तहसिलदार अनंत गुरव या अधिका-यांनी आपल्या कर्तव्य बजावत अनोखे नानाविध सामाजिक उपक्रमात सहभाग घेऊन आपल्या सामाजिक कार्याची झलक दाखवली आहे,

वनविभाग सातारा , वनपरिक्षेत्र वनविभाग पाटण यांच्या वतीने खास वटपौर्णिमा निमीत्ताने वड महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी या कार्यक्रमाला पाटणचे प्रांताधिकारी सुनिल गाढे तहसिलदार अनंत गुरव, यांच्या सह वनविभागाचे अधिकारी उपस्थित होते. वटपौर्णिमा निमीत्ताने या अधिकाऱ्यांनी उपक्रर्मात हिरीरीने सहभाग घेत वडाच्या फांद्यांचे वृक्षारोपण करून




एक सामाजिक संदेश दिला आहे.

वटपौर्णिमा म्हणजे स्त्रियांनी ७ जन्म तोच जोडीदार मिळावा तसेच आपल्या पतीच्या दीर्घायुष्य साठी देखील हे व्रत ठेवतात. मात्र पुरुषांनी या दिवशी काय करायचे किंवा केले पाहिजे ? हा खरा प्रश्न आहे. आणि त्याचे एक सकारात्मक , वैज्ञानिक तसेच पर्यावरण विषयक दृष्टिकोन असलेले उत्तर आम्ही शोधण्याचा प्रयत्न केला असल्याचे या अधिकाऱ्यांच मत आहे.

वडाचे झाड हे २०० ते २५० वर्ष जगते. त्याच्या पारब्याच्या आधारे त्याची विस्तीर्ण छाया निर्माण होते. असंख्य पक्षी, कीटक यांचे ते आश्रयस्थान असते. वन्य प्राण्यांसाठी तो हककाचा निवारा असतो. वडाच्या झाडाच्या सालीं मध्ये वेदनाशामक औषधी गुणधर्म असतात. सर्वात महत्वाचे म्हणजे या झाडामध्ये २० तासापेक्षा अधिक काळ पर्यावरणात ऑक्सीजन सोडण्याची क्षमता असते व कार्बन डायॉक्साईड शोषण्याची क्षमता असते. जे प्रदूषण टाळण्याच्या दृष्टीने खूप आवश्यक आहे.याची मुळ खोलवर जाऊन पाण्याची पातळी नियत्रित ठेवतात. सर्वात महत्वाचे म्हणजे याची फांदी लावली काय किंवा रोप लावले काय , तरी ते प्रतिकूल परिस्थितीत देखील टिकते हे विशेष आहे. हे सगळे मानव जातीसाठी फायदे असले तरी आता जुनी वडा ची वेगवेगळ्या कारणांस्तव झाडे तोडली जात आहेत . परंतु नवीन झाडे मात्र लावताना कोणी दिसत नाही. मुंबई पुण्यासारख्या शहरात तर हे आता जागेअभावी शक्यच वाटत नाही.परंतु पाटण सारखी अजून बरीच ठिकाणे आहेत जिथे अशी झाडे लावणे खूप आवश्यक आहे.

# --- तर सरकारलाच महागात पडेल आमचा नाईलाज आहे

## मनोज जरांगे पाटील यांचा इशारा



**मुंबई :** आमच्या हक्काचं आरक्षण आहे. तेच आम्ही मागतोय. ओबीसी मात्र त्यांना आरक्षण असून अजून जास्त आरक्षण मागत आहेत. येवल्याच्या भुजबळांना सर्वच ओरबाडून घ्यायचं आहे. आमचं तसं नाही. आमच्या नोंदी आहेत. त्यामुळे आरक्षण आमच्या हक्काचं आहे. सरकार तसं करणार नाही. पण सरकारने तसं केलं तर सरकारलाच महागात पडेल. सरकारने पूर्वी सारखच केलं तर पुन्हा सरकारचे हाल होतील.

आमचा नाईलाज आहे, असा इशाराच मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. मंडल आयोगाने १४ टक्के आरक्षण दिलं. १९८४ला ज्या नेत्याने आरक्षण दिलं तेही रद्द करा. त्या नेत्यावर कारवाई करा. मंडल आयोगावर कारवाई करा. द्वेष आणि जातीयवाद तुम्हीच वाढवणार, आमच्यावर आरोप करता. तुम्हीच आरक्षण देता आणि तुम्हीच रद्द करता हा कुठला न्याय? असा सवाल मनोज जरांगे यांनी केला.

आमच्या ५७ लाख नोंदी सापडल्या. आता तुम्ही प्रमाणपत्र देत नाही. तुम्हीच खोड्या काढता. आम्ही विचारलं तर आम्ही जातीयवादी का? हम करे सो कायदा आहे का? असा सवाल त्यांनी केला.

# सोलापूर माढा पराभवाच्या चिंतनाला निरीक्षक धनंजय महाडिक सोलापुरात

## दोन देशमुखांची दांडी



**सोलापूर :** सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टीचा पराभव झाला. या प्रभावाची चिंतन बैठक शनिवारी सोलापुरात शांतीसागर मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आली. त्यासाठी निरीक्षक म्हणून राज्यसभेचे खासदार धनंजय महाडिक यांची नेमणूक झाली आहे महाडिक यांच्या उपस्थितीत ही बैठक सोलापुरात सुरू आहे. या बैठकीला आमदार तथा जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी, जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार, शहराध्यक्ष नरेंद्र काळे, विक्रम देशमुख, मनीष देशमुख यांच्यासह प्रमुख पदाधिकारी यांची उपस्थिती आहे.

या अतिशय महत्त्वाच्या बैठकीला सोलापूरचे दोन माजी मंत्री तथा विद्यमान आमदार विजयकुमार देशमुख आणि आमदार सुभाष देशमुख या दोघांचीही अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवली. बैठक असल्याने सोलापुरातील माध्यम प्रतिनिधींनी शांतीसागर मंगल कार्यालयात मोठी गर्दी केली होती परंतु पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची चिंतन बैठक असल्याने जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी यांनी माध्यम प्रतिनिधींना बैठकीला न बसण्याची विनंती केली.

# अनाथ मुलांचे पालक पोषक करणारी संस्था मागील पंचवीस वर्षांपासून कार्यरत

**पिंपरी चिंचवड :** श्रीक्षेत्र आळंदी येथील श्रीरामकृष्ण वारकरी शिक्षण संस्थेतील प्रत्येक मुलांना वाहया पुस्तके कंपास पेन्सिल पेन शॉपनर चित्रकलेच्या वह्या पाण्याची बॉटल जेवणाचा डबा खेळण्याचे साहित्य त्यामध्ये कॅरम बॉल बॅट रंगपेटी संपूर्ण कीट देण्यात आले एक वर्षभर पुरेल एवढे पेन पेन्सिल व स्टेशनरी मुलांना वाटप करण्यात आले आहे

ज्या व्यक्तींनी दिली त्यांनी त्यांचं नाव गुपित ठेवण्यासाठी सांगितले आहे त्यांनी त्यांच्या भाषणांमधून सांगितलं की आम्ही जे दान देतो त्याचा कोठेही उल्लेख झाला नाही पाहिजे अशा पद्धतीने त्यांनी श्रीरामकृष्ण वारकरी शिक्षण संस्था आळंदी व श्रीरामकृष्ण अनाथ आश्रम मरकळ या



संस्थेतील मुलांना लागणारे सर्व शालेय साहित्य वाटप केले.

श्रीरामकृष्ण वारकरी शिक्षण संस्था गेली पंचवीस वर्षापासून आळंदी मध्ये गरीब गरजू कष्टकरी शेतकरी अनाथ मुलांचे पालन पोषण करत आहे त्याचबरोबर त्यांचा शालेय शिक्षण देण्याचे काम सतत चालू आहे.

संस्थेमध्ये अनेक उपक्रम राबवले जातात सर्व संतांच्या पुण्यतिथीच्या व महापुरुषांच्या साजरा केला जातात त्यानिमित्ताने आपले संस्कृती या मुलांना कळावी व आपल्या संस्कृतीचा वारसा असाच पुढे चालत राहावा या शुद्ध हेतूने संस्था अनेक शहरांमध्ये अनेक भागांमध्ये मग व्यसनमुक्ती असो किंवा आरोग्य शिबिरासह संस्कार शिबिर असो असे अनेक प्रकारचे कार्य संस्थेच्या अध्यक्ष मोहन महाराज शिंदे व उपाध्यक्ष विलास तात्या बालवडकर व सर्व संचालक मंडळ यांच्या सहकार्यातून हे कार्य सुरू आहे हे कार्य करत असताना संस्थेला अनेक काम करायचे आहेत.

त्यासाठी दानशूर व्यक्तीने हे कार्य अखंड चालू राहण्यासाठी या धर्म कार्यामध्ये सहकार्याची अपेक्षा आहे आपल्या सहकार्याशिवाय हे काम पूर्ण होणार नाही याची आम्हाला जाणीव आहे आणि आपण सहकार्य करणार त्या सहकार्यातून अनेक मुलं घडवण्याचं काम केलं जाईल व अनेक मुलांना त्याचा आपल्या दानाचा फायदा होणार आहे कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष मोहन महाराज शिंदे पत्रकार अर्जुन मेदनकर एम डी पाखरे रामचंद्र सारंग कृष्णा कोलते कदम काका इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# प्रणिती शिंदेंसमोर महादेव कोगनुरे यांचे शक्तीप्रदर्शन

## लोकसभेत साथ दिली भविष्यात साथ देण्याचा प्रणितींचा शब्द

**मुंबई :** महादेव कोगनुरे हे एक दानशूर व्यक्ती म्हणून परिचित आहेत. गरीब-गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचे त्यांचे कार्य हे नक्कीच कौतुकास्पद आहे. यामुळे जिल्हा परिषद शाळा सुधारण्यास मदत होईल. लोकसभा निवडणुकीत महादेव कोगनुरे यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश करुन मला साथ दिली आहे. भविष्यात मी त्यांना नक्कीच साथ देईन असा शब्द नुतन खासदार प्रणिती शिंदे यांनी येथे बोलताना दिला.



सागर सिमेंट व एम के फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनुरे यांच्यावतीने कर्मयोगी अप्पासाहेब काडादी सांस्कृतिक भवन सिध्देश्वर साखर कारखाना सोलापूर येथे दोन लाख वह्या वाटप व सायकल भेट कार्यक्रमाचा शुभारंभ खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. हा कार्यक्रम घेऊन कोगनुरे यांनी एकप्रकारे शक्तिप्रदर्शन केल्याचे पाहायला मिळाले.

यावेळी शिवपुत्र महास्वामी, वेदमूर्ती महांतेश हिरेमठ, धर्मराज काडादी, दत्तात्रय मुळे, सागर सिमेंटचे सेल्स प्रमोटर आनंद लोणावत, सुरेश शर्मा, राधाकृष्ण पाटील, अशोक देवकते, सिध्दाराम चाकोते तसेच दक्षिण सोलापूर तालुक्यातील बहुसंख्य मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी तसेच एम के फाउंडेशन व सागर सिमेंटचे पदाधिकारी सदस्य आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, तुम्ही मला खासदार म्हणून निवडून आणून एक संधी दिली आहे. या संधीचे सोनं करण्याचे काम मी नक्कीच करेन यासाठी तुमचे सदैव साथ माझ्या पाठीशी असणे गरजेचे आहेत.

यावेळी धर्मराज काडादी बोलताना म्हणाले, लहान वयात महादेव कोगनुरे हे एक युवा उद्योजक म्हणून पुढे येत आहेत. शिक्षणापासून वंचित असणाऱ्या मुलांना शैक्षणिक साहित्य व मदत देऊन त्यांना शिक्षणप्रवाहात आणण्याचे महादेव कोगनुरे यांचे प्रयत्न कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महादेव कोगनुरे म्हणाले, सामाजिक कार्य करत असताना आज ही अनेक वेळा माझ्यावर टीका केली जाते. याकडे मी दुर्लक्ष करीत मी माझ्या सामाजिक ऋण फेडण्याचे काम प्रामाणिकपणे करत असल्याचे सांगितले.

# अपेक्षेप्रमाणे अमोल जाधव यांच्याकडे झेडपी समाज कल्याणचा चार्ज

**सोलापूर :** सोलापूर जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकारी पदाच्या संगीत खुर्चीचा खेळ मागील काही दिवसांपासून पाहायला मिळतो. तत्कालीन समाज कल्याण अधिकारी सुनील खमीतकर यांचे निलंबन झाल्यानंतर त्यांच्या जागेवर महिला व बालकल्याण विभागाचे अधिकारी प्रसाद मिरकले यांच्याकडे पदभार देण्यात आला होता परंतु महिन्यातच त्यांनी स्वतःहून पदभार सोडला

तो पदभार जिल्हा परिषद सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांच्याकडे दिला गेला.

आता महिना दीड महिन्यातच तो चार्ज बदलण्यात आला आहे. हा पदभार पाणी व स्वच्छता विभागाचे प्रकल्प संचालक अमोल जाधव यांच्याकडे देण्यात आला आहे. सध्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांच्याकडे बदली प्रक्रियाचे कामकाज असल्याने त्यांना समाज कल्याण विभागाकडे व्यवस्थित लक्ष देता येत नव्हते.

त्याचबरोबर विधानसभेपूर्वी निधी खर्च पडण्यासाठी कामाचा निपटारा लवकरात लवकर करण्याची गरज आहे आणि त्यात पूर्णवेळ अधिकारी आवश्यक असून पाणी व स्वच्छता विभागातील कामकाज पाहता समाज कल्याणचा पदभार अमोल जाधव यांच्याकडे देण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी घेतला आहे.

# गौरीशंकर फार्मसीमध्ये बौद्धिक संपदा हक्क कार्यशाळा संपन्न

**सातारा :** उच्चशिक्षणाच्या ज्ञानाच्या आधारे केलेले नविन्यपूर्ण संगोधनाचे हक्क विशिष्ट कालवधीसाठी संरक्षण करण्यासाठी जो मूलभूत अधिकार प्राप्त झाला आहे याविषयाची कायदेशीर माहितीचे प्रबोधन करण्यासाठी गौरीशंकर इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल ऐज्युकेशन अँड रिसर्च, लिंब महाविद्यालयात बौद्धिक संपदा हक्क ( आय.पी.आर ॲन्ड रेग्युलेटरी अफैर) ही सहा दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

मानवी जीवनाची बदलती जीवनशैली मुळे निर्माण होणारे विविध आजार व त्यावर परिणामकारक उपचार पद्धती विषयी व स्वःता केलेले संशोधन बाबतचे हक्क प्राप्त झालेले असता ते इतराना विशिष्ट कालवधीत वापरत येत नाही. याबाबतचे प्रबोधन व मार्गदर्शन या कार्यशाळेत विद्यार्थाना करण्यात आले .

यावेळ संस्थेचे जनसंपर्क अधिकारी श्रीरंग काटेकर, प्राचार्य डॉ योगेश गुरव, यांच्या हस्ते कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

यावेळी कार्यशाळेचे समन्वयक डॉ संतोष बेल्हेकर, डॉ.भूषण पवार, डॉं.धैर्यशील घाडगे, प्रबंधक निलेश पाटील आदी प्रमुख उपस्थित होते.

सहा दिवसीय कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी औषध निर्माण शास्त्र शाखेतील नाविन्यपूर्ण संशोधनाची निवड कशा प्रकारे करावी तसेच औषध निर्माण शास्त्र शाखेतील जागतिक स्तरावरील बदलत्या घडामोडी व त्यामधील करिअरची संधी याबाबत विद्यार्थ्याना राष्ट्रीय स्तरावरील तज्ञ डॉ.महेश जाधव, डॉ. प्रवीण बुगे, सचिन गुंदेजा,अमित कुंभार, प्रमोद बोरकर, केदार मोरे या तज्ञांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी जनसंपर्क अधिकारी श्रीरंग काटेकर म्हणाले की गुणवत्ता कौशल्य व व्यवहार ज्ञानाची जीवनात सांगड घालता आली पाहिजे तसेच उज्वल करिअरसाठी आवश्यक बाबीकडे विद्यार्थ्यांनी लक्ष देणे गरजेचे आहे. यावेळी प्राचार्य डॉ. योगेश गुरव म्हणाले की औषध निर्माण शास्त्राचे ज्ञान घेताना केवळ नोकरी व्यवसाय ही उद्दिष्टे विद्यार्थ्यांनी डोळ्यासमोर न ठेवता समाजाला उपयुक्त ठरणारे नाविन्यपूर्ण संशोधनाचा ध्यास घेऊन वाटचाल करावी.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा .रोहन खुटाळे, प्रा. कीर्ती माने, प्रा .गौरी इथापे, प्रा.दुधेश्वर क्षीरसागर, प्रा. स्वप्नाली झोरे यांनी परिश्रम घेतले .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार नूतन गवांदे हीने केले.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# तलाव व बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी १९ कोटींचा निधी द्या; लघुसिंचन विभागाचा प्रस्ताव

**नागपूर :** ज़िल्हा परिषदेच्या लघुसिंचन विभागाच्या अखत्यारित ४७० तलाव आहेत. अतिवृष्टी आणि पुरामुळे मागील काही वर्षात तलावांचे नुकसान झाले. नादुरुस्त तलावांची दुरुस्ती, लघुपाटबंधारे, कोल्हापुरी बंधारे व दुरुस्तीसाठी १८ कोटी ८७ लाख रुपयांच्या निधीची मागणी लघुसिंचन विभागाने केली आहे. त्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे पाठविण्यात आला आहे.



२०२२ मध्ये जुलै आणि ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्हयातील जवळपास ११० तलाव नादुरुस्त झाले होते.१३७ तलावांना अतिवृष्टीमुळे मोठा धोका निर्माण झाला होता. १५ ऑगस्ट २०२२ लाउमरेड तालुक्यातील एक तलाव फुटला होता. तर, याच वर्षात १४ जुलैला कुही तालुक्यातील देवळी खुर्द येथील एक तलावही फुटला होता. २०२३ मध्ये १३५ तलावांना अतिवृष्टीचा फटका बसला होता. यासाठी ७.६९ कोटींची मागणी केली होती. परंतु निधी अभावी तलावांची दुरुस्ती झाली नाही.

**नाला खोलीकरण करा**

अतिवृष्टी व पुरामुळे नाल्यात मोठ्याप्रमाणात गाळ साचल्याने पावसाळ्याच्या दिवसात नाल्यांना पूर आल्यास पुराचे पाणी लगतच्या शेतात शिरते. यामुळे शेती व पिकाचे मोठे नुकसान होते. याचा विचार करता जिल्ह्यात नाले खोलीकरण मोहीम राबविण्यात यावे, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. १९ कोटींच्या प्रस्तावात नाले खोलीकरणांच्या कामांचाही समावेश आहे.

**प्रस्तावात १८८ कामांचा समावेश**

लघुसिंचन विभागाच्या प्रस्तावात १८८ कामांचा समावेश आहे. यात लघुपाटबंधाऱ्यासाठी भूसंपादन, लघुपाटबंधारे योजना व दुरुस्तीचे ३५ कामे, कोल्हापुरी बंधारे बांधकाम व दुरुस्ती, नाला खोलीकरण अशा १३२ कामांचा समावेश आहे. जिल्हा नियोजन समितीकडून प्रस्तावांना मंजुरी मिळण्याची अपेक्षा आहे. जिल्ह्यातील एकूण तलाव ४७०

- **लघु सिंचन-१३४**
- **पाझर तलाव-६०**
- **गाव तलाव-३९**
- **मामा तलाव-२१४**
- **साठवण तलाव-२४**

# महाराष्ट्रात पेशवाई आणण्याचा प्रयत्न कदाही खपवून घेतला जाणार नाही: नाना पटोले

**मुंबई :** नाशिकमध्ये दलित समाजाविरोधात पत्रके वाटण्यात आली असून चातुर्वर्ण्य व्यवस्था आणण्याचा हा प्रयत्न दिसत आहे. शिवाजी महाराज, शाहू, फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात सामाजिक द्वेष पसरवणारे जातीवाचक प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. काही विकृत्त प्रवृत्ती महाराष्ट्रातील वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करत आहेत पण तो यशस्वी होऊ दिला जाणार नाही. पत्रकातील भाषा पाहता महाराष्ट्रात पेशवाई आणण्याचा काही समाज विघातक लोकांचा प्रयत्न दिसत आहे पण तो हाणून पाडू, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे.

पुणे येथे पत्रकारांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपा सरकारवर सडकून टीका केली, ते पुढे म्हणाले की, नाशिकमध्ये दलित समाजाच्या विरोधात वाटण्यात आलेले पत्रक हा या समाजाचा अपमान करणारे आहे. अशा प्रकारच्या घटना सरकारच्या आशिर्वादाने होत असतील तर त्या तातडीने थांबवा आणि ज्यांनी हे पाप केले आहे त्यांच्या मुसक्या आवळून कठोर शिक्षा करा. या पत्रकारावर पत्रक प्रसिद्ध करणाऱ्याचे नावही आहे. राज्य सरकारने या प्रकरणात तातडीने लक्ष घालून अशा प्रवृत्तींना ठेचून काढले पाहिजे. काँग्रेस पक्ष या प्रकारच्या प्रवृत्तीचा तीव्र निषेध करत आहे, असेही नाना पटोले म्हणाले.

आरक्षणप्रश्नी फडणवीस व बावनकुळेंची भूमिका वेगवेगळी

आरक्षण प्रश्नी भारतीय जनता पक्ष मराठा व ओबीसी समाजाची फसवणूक करत आहे. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे ५० टक्केच्या वर आरक्षण टिकत नाही असे सांगत आहेत तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मात्र ५० टक्क्याच्या वर आरक्षण देता येते असे म्हणत आहेत. भाजपाच्या दोन नेत्यांमध्ये आरक्षणप्रश्नी दोन मते आहेत. आरक्षण प्रश्नी नेमकी भूमिका काय हे त्यांनी स्पष्ट करावे. ५० टक्क्यांच्या वरचे आरक्षण कोर्टात टिकणार नाही हे पाटणा उच्च न्यायालयाच्या निर्णयाने स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आरक्षणावरून भाजपाचा खरा चेहरा उघडा पडला आहे हे बावनकुळे व फडणवीस यांच्या भूमिकेतील तफावत पाहता स्पष्ट होते. देशात सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक सर्वे करून जात निहाय जनगणना करणे व ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा हटवणे हाच आरक्षणावरचा पर्याय आहे आणि काँग्रेस पक्षाची ही भूमिका राहुल गांधी यांनी स्पष्ट केलेली आहे. केंद्रात व राज्यात भाजपाचे सरकार आहे त्यांनी जातनिहाय जनगणना सुरु करावी म्हणजे मराठा, ओबीसी धनगर, आदिवासी, हलबा सह देशातील इतर जातींच्या आरक्षणाच्या प्रश्नांना न्याय देता येईल, असेही नाना पटोले म्हणाले.

## कोयना धरण क्षेत्रात पावसाचा जोर

**सातारा :** जिल्ह्याच्या पूर्व भागात पावसाची उघडीप असली तरी पश्चिमेकडे जोर कायम आहे. यामुळेकोयना धरणपाणीसाठ्यात दोन दिवसांत एक टीएमसीने वाढ झाली आहे. धरणातील पाणीसाठा १६ टीएमसीजवळ पोहोचला. तर शनिवारी सकाळपर्यंतच्या २४ तासात नवजाला सर्वाधिक ७४ मिलीमीटरपाऊसझाला आहे.

जिल्ह्यात यावर्षी मान्सूनचापाऊसवेळेत दाखल झाला. ६ जूनपासून सर्वत्र पावसाला सुरुवात झाली. पूर्व भागात यंदा धो-धो पाऊस बरसला. त्यामुळे ओढ्यांना पाणी वाहिले. बंधारे भरले आहेत. तसेच विहिरींची पाणीपातळीही वाढली आहे .सध्या जमिनीला वापसा नसल्याने खरीप हंगामातील पेरणी खोळंबलीय. पावसामुळे खरीप हंगामातील पिकांना पाणी कमी पडणार नाही. परिणामी खरीपातील पेरणी यंदा १०० टक्के होण्याचा अंदाज आहे. तर पश्चिम भागातही पावसाने दमदार हजेरी लावली आहे.

मागील तीन दिवसापासून पूर्व भागात पाऊस कमी झाला असलातरी पेरणीसाठी अडचणी येणार नाही. तर पश्चिमेकडे पावसाचा जोर आहे. कास, बामनोली, तापोळा, कोयना, नवजा, महाबळेश्वर यासह कांदाटी खोऱ्यात पाऊस पडत आहे. तसेच पश्चिमेकडील धरण क्षेत्रातील पाऊस सुरू आहे .यामुळे धरण पाणीसाठा हळूहळू वाढू लागलाय.

शनिवारी सकाळपर्यंतच्या २४ तासात कोयनानगर येथे ६८ तर नवजाला ७४ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. महाबळेश्वरलाही ६० मिलिमीटर पाऊस पडला. तर एक जूनपासून आतापर्यंत कोयना येथे ५०७, नवजा ६२६ आणि महाबळेश्वरला ४२१ मिलिमीटर पाऊस पडल्याची नोंद झाली आहे. दोन दिवसातकोयना धरणातएक टीएमसीने वाढ झाली आहे. शनिवारी सकाळी धरणात १५.९१ टीएमसी पाणीसाठा झाला होता. धरणातील विसर्ग मागील काही दिवसापासून बंद आहे. ऊतएठढखडएचएछढझुेशीशव लूकोयना धरणात मागीलवर्षी ११ टीएमसी साठा; पाऊसही कमी.. जिल्ह्यात गेल्यावर्षी मान्सूनचे आगमन उशिरा झाले. तसेच पावसालाही उशिरा सुरुवात झाली. त्यामुळे धरणातील पाणीसाठा वाढला नव्हता.



# कोऱ्हाळे शाळेसाठी ग्रामस्थांचे योगदान : अनिल संकपाळ

**आदर्की :** फलटण तालुक्यातील कोऱ्हाळे शाळा गुणवत्ता व स्वच्छ व सुंदर शाळेमधे पुढे आहे. शाळेची आता स्मार्ट शाळा म्हणून निवड झाली आहे. शिक्षक, ग्रामस्थ यांनी लोकसहभागातून काही प्रमाणात आर्थिक श्रमदानरूपी मदत करायची आहे.

शासन भौतिक सुविधा देणार असल्याचे फलटणचे गटशिक्षण अधिकारी अनिल संपकाळ यांनी सांगितले.

कोऱ्हाळे, ता फलटण येथील जिल्हा परिषद प्राथमिक कोऱ्हाळे शाळेची स्मार्ट शाळा म्हणून निवड झाल्याबध्दल त्याच्या उदघाटन प्रसंगी बोलत होते.

यावेळी शैक्षणिक उठावातून मुलाना स्मार्ट टेबल शाळेत घेतले आहेत. व्यासपीठावर सरपंच सुरेखा शिंदे, जगन्नाथ शिंदे, दयानंद शिंदे, संतोष शिंदे केंद्र प्रमुख निकाळजे, प्रिती काशीद, नानासाहेब शिंदे, विलास शिंदे मुख्याध्यापक राजेंद्र पवार उपस्थित होते.

संकपाळ पुढे म्हणाले, जुन ते मार्च महिन्यापर्यंत शासन स्तरावरून शाळेला सर्व भौतिक सुविधा पुरविण्यात येणार आहेत. त्यमुळे ग्रामस्थ माजी विद्यार्थी यांनी श्रमदान व आर्थिक निधी उभारून लोकसहभागातुन कामे करावयाची आहेत.

स्मार्ट शाळा बनविनासाठी चोवीस निकष असुन त्यामधे शाळा इमारत, पिण्याचे स्वच्छ पाणी, विद्यार्थी पटानुसार शौचालय , युनिट, संगणक कक्ष आदि निकष पूर्ण करावयाचे आहे. त्या साठी शासन भौतिक सुविधा देण्यासाठी कमी पडणार नाही त्यासाठी शिक्षक व ग्रामस्थ यांनी प्रयत्न करावेत. कार्यक्रमास कोऱ्हाळे बिबी वडगांव वाघोशी वाघजाईनगर येथिल पालक व शालेय समितीचे सदस्य शिक्षक वृंद उपस्थित होते. आभार संजय बोबडे यांनी मानले.

# उद्यानदुत प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांचे उत्स्फुर्त स्वागत

**फलटण :** फलटण एज्युकेशन सोसायटी संचलित श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालय फलटणच्या सातव्या सत्रातील उद्यानदुत प्रशिक्षणासाठी वाघोशी ता. फलटण जि. सातारा येथे दाखल झाले असुन वाघोशी ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थांनी या उद्यानदुत विद्यार्थाचे उत्स्फुर्त स्वागत केले.

ग्रामीण उद्यानविदया कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत सुमारे २० आठवडे येथे वास्तव्यास राहणार असलेले हे विद्यार्थी शेतकऱ्यांना



शेतिविषयक माहिती, नवीन तंत्रज्ञान याबाबत माहिती देऊन गावामध्ये शेतिविषयक विविध उपक्रम व कार्यक्रम राबविणार आहेत. माती परीक्षण, फळबाग लागवड, एकात्मिक कीड रोग, बीज प्रक्रिया, आधुनिक शेती औजारे वापर शेतीचा आर्थिक फायदा, जनावरांचे लसीकरण आदीबाबत उपस्थित गावकरी व शेतकऱ्यांशी संवाद साधणार असल्याचे या उद्यान दूतांनी सांगितले. उद्यानविद्या विषयक जनजागृती करण्यास उद्यानविदया कार्यानुभव यांचा अभ्यास उद्यानदुत करणार आहेत. दहिटणे सुहास, बागल प्रथमेश, मगदुम आदित्य, हाळे धन्यकुमार, वाळुंजकर करण रुपणवर रोहित हे उद्यानदूत येथे दाखल झाले आहेत. त्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन सरपंच ताराचंद पवार व समस्थ ग्रामस्थ यांनी यावेळी दिले. सरपंच ताराचंद पवार ग्रामसेवक एस एन शिंदे व सर्व ग्रामस्थ यावेळी उपस्थीत होते.

उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. निंबाळकर, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यु. डी. चव्हाण, कार्यक्रम अधिकारी प्रा जे व्ही. लेंभे व प्रा. ए. डी. पाटील यांचे मार्गदर्शन या विद्यार्थ्यांना लाभणार आहे.

## प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा : कृषी विभागाचे आवाहन

**सातारा :** नैसर्गिक आपत्ती, कीड रोग इत्यादी कारणांने पिकाचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांचे स्थैर्य अबाधित राखण्यासाठी केंद्र शासनाने खरीप हंगाम २०२४ साठी प्रधानमंत्री पीक विमा योजना पुढे सुरु ठेवली आहे.

सातारा जिल्ह्यातील तालुकानिहाय महसूल मंडलनिहाय पिके व क्षेत्रे अधिसूचित केली असून भात, ख. ज्वारी, बाजरी, नाचणी, भूईमूग, सोयाबीन, मूग, उडीद, व ख. कांदा ९ पिकांसाठी ही योजना लागू आहे.

शेतकऱ्यांनी फक्त १ रुपया विमा हप्ता रक्कम भरावयाची असून उर्वरीत विमा हप्ता केंद्र व राज्य शासन भरणार आहे. या याजनेत सहभागी होण्यासाठी १५ जुलै २०२४ ही अंतिम मुदत आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाग्यश्री फरांदे यांनी दिली आहे.

## सर्वच धरणांच्या पाणलोट क्षेत्रात कमी-अधिक पाऊस



**फलटण :** धोम-बलकवडी, भाटघर, नीरा-देवघर, वीर व गुंजवणी धरण पाणलोट क्षेत्रात पावसाला समाधानकारक नसली तरी सुरुवात झाली आहे, तथापि अद्याप मान्सून सक्रिय झाला नसल्याची चर्चा आहे. आगामी काळात उत्तम पाऊस होईल आणि सर्व धरणे भरतील, अशी अपेक्षा आहे. २३ टीएमसी क्षमतेच्या भाटघर धरण परिसरात आज सकाळी संपलेल्या २४ तासात १२ मि. मी. पाऊस झाला, आजपर्यंत १५४ मि. मी. पाऊस झाला आहे. धरणात १.५२ टीएमसी म्हणजे ६.४५ टक्के पाणीसाठा आहे. १० टीएमसी क्षमतेच्या वीर धरण परिसरात आज सकाळी संपलेल्या २४ तासात ०.०० मि. मी. पाऊस झाला असून आजपर्यंत १२१ मि. मी. पाऊस झाला आहे. धरणात १.८९ टीएमसी म्हणजे २०.०९ टक्के पाणीसाठा आहे.१२ टीएमसी क्षमतेच्या नीरा - देवघर धरण परिसरात काल ३५ मि. मी. पाऊस झाला असून आजपर्यंत १६२ मि. मी. पाऊस झाला आहे. धरणात १.०९ टीएमसी म्हणजे ९.३० टक्के पाणी साठा आहे. ४ टीएमसी क्षमतेच्या गुंजवणी धरण परिसरात काल ५१ मि. मी. पाऊस झाला असून आजपर्यंत १८६ मि. मी. पाऊस झाला आहे. धरणात ०.३६१ टीएमसी म्हणजे ९.७७ टक्के पाणी साठा आहे. ४ टीएमसी क्षमतेच्या धोम - बलकवडी धरण परिसरात काल ८४ मि. मी. पाऊस झाला असून आजपर्यंत २४० मि. मी. पाऊस झाला आहे. धरणात ०.०४ टीएमसी म्हणजे ०.९२ टक्के पाणी साठा आहे.

## करिअर शिबीर मेळाव्याचे २५ रोजी आयोजन

**सातारा :** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग मार्फत औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सातारा यांच्यावतीने छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. हा करिअर शिबीर मेळावा स्व. यशवंतराव चव्हाण बहुउद्देशीय सभागृह, जिल्हा परिषद जवळ सातारा येथे दिनांक २५ जून रोजी दुपारी ०१.०० वाजता आहे. पालकमंत्री शंभुराज देसाई, यांच्या हस्ते या मेळाव्याचे उद्घाटन होणार आहे. यावेळी श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले, श्रीमंत छत्रपती शिवेंद्रराजे भोसले, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी उपस्थितीत असतील.

या शिबिरात इयत्ता १० वी, १२ वी, पदवीधर, आय. टी. आय, तांत्रिक अभ्यासक्रमाची मुले मुलींसाठी रोजगाराच्या व स्वयंरोजगाराच्या संधी बाबत तज्ञामार्फत मार्गदर्शन होणार आहे. तरी सातारा परिसरातील इयत्ता १० वी ते पदवीधर, बेराजगार, तांत्रिक शिक्षणाचे विद्यार्थी उमेदवार यांनी लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे प्राचार्य, संजय मांगलेकर यांनी केले आहे.

# सत्तेत राहूनही स्व. प्रतापराव भोसले यांनी साधेपणा जपला : प्रा. रमेश डुबल

**वाई :** अत्यंत साध्या शेतकरी कुटुंबात जन्माला आलेला मुलगा सरपंच पदापासून ते वाई मतदार संघातून चार वेळा आमदार, महाराष्ट्र राज्याचे ग्रामीण विकास मंत्री, सातारा लोकसभा मतदारसंघातून तीन वेळा खासदार, तसेच केंद्र सरकारच्या अनेक महत्त्वाच्या कमिट्यांवर सदस्य म्हणून नियुक्ती आणि या माध्यमातून शेतकरी वर्गासाठी केलेले काम, हा स्व. प्रतापराव भोसले यांचा राजकीय प्रवास अतुलनीय आहे. सत्तेच्या सारीपाटात स्व. भाऊंना स्वतःला आणि आपल्या कुटुंबासाठी खूप काही करता आले असते. परंतु, तसे न करता अत्यंत निःस्वार्थ बुद्धीने समाजासाठी काम करीत राहिले आणि खऱ्या अर्थाने स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या साली गेलेली सत्ता स्व. प्रतापराव.

विचारांचा वारस म्हणून त्यांनी भारतीय राजकारणात आपले नाव कोरले, असे प्रतिपादन किसन वीर महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. रमेश डुबल यांनी केले.



व्याख्यानात ते बोलताना प्रा. रमेश डुबल व्यासपिठावर मान्यवर.

येथील किसन वीर महाविद्यालयाच्यावतीने जनता शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त स्व. प्रतापराव भोसले (भाऊ) यांच्या प्रथम मासिक पुण्यस्मरण दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुरूनाथ फगरे होते. याप्रसंगी जनता शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. जयवंतराव चौधरी, स्टाफ सेक्रेटरी डॉ. अंबादास सकट, किसन वीर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विवेक सुपेकर, पर्यवेक्षक प्रा. बाळासाहेब कोकरे तसेच रसायनशाख विभागाचे माजी विभाग प्रमुख प्रा. कचरे, माजी प्रभारी प्रायार्य डॉ. एकनाथ भालेराव उपस्थित होते.

प्रा. रमेश डुबल पुढे म्हणाले की, महाराष्ट्रात काँग्रेसची १९९५ भोसले यांनी आपल्या महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अध्यक्षपदाच्या कार्यकाळात म्हणजे १९९९ साली काँग्रेसची गेलेली सत्ता पुन्हा आणली. स्व. भाऊंनी ग्रामीण विकास मंत्री असताना धोम, कण्हेर आणि आंधळी धरणांची निर्मिती करून, विस्थापितांच्या पुनर्वसनाचे काम आदर्श पद्धतीने केले. समाजामधील वंचित, उपेक्षितांना न्याय देण्याचा प्रयन भाऊंनी आयुष्यभर केला. विशेषतः विदर्भ मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना दत्तक घेऊन, जनता शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांना शिक्षण देण्याचा उपक्रम हा महाराष्ट्र राज्यातील अभिनव उपक्रम मानावा लागेल. प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे म्हणाले की, स्व. प्रतापराव भाऊ यांच्या विचारांची आज समाजाला गरज आहे. त्यांच्या विचारांच्या पावलावरच जनता शिक्षण संस्था आणि किसन वीर महाविद्यालय हे कार्यरत राहील. स्व. भाऊंनी जो आदर्श घालून दिलेला आहे त्या आदर्शाच्या वाटेवरून आम्हा सर्वांची वाटचाल सुरु आहे. किसन वीर महाविद्यालयाच्या वतीने स्व. भाऊंना आदरांजली वाहण्याच्यानिमित्ताने वर्षभर १२ व्याख्यानमालेचं आयोजन करण्यात आलेलं आहे. या व्याख्यानमालेच्या माध्यमातून स्व. भाऊंच्या आठवणींना उजाळा मिळेल तसेच त्यांचे आदर्शवत विचार समाजामधील तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतील. प्रास्ताविक प्रा. बाळासाहेब कोकरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. बाळासाहेब कोकरे

## कृषीकन्यांमार्फत वटपौर्णिमेचे औचित्य साधुन

# वनरक्षक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण कार्यक्रम

**हिंगणगाव :** महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी मान्यताप्राप्त फलटण एज्युकेशन सोसायटीचे कृषी महाविद्यालय फलटण येथील कृषीकन्यांनी ग्रामीण जागरूकता कृषी कार्यानुभव व औद्यागिक जोड प्रकल्प २०२४-२५ कार्यक्रमांतर्गत हिंगणगाव येथे वटपौर्णिमेनिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम घेतला.

वृक्षारोपणावेळी हिंगणगावच्या सरपंच सौ. दीपिका संदीप भोईटे,वनरक्षक अधिकारी देवकी तहसीलदार, वनमजूर धनंजय सूळ व शेतकरी महिला उपस्थित होत्या.यावेळी वटपौर्णिमेनिमित्त वटवृक्षाची रोपे लावली.



वटपौर्णिमा हा सण पूर्वीचे लोक का साजरे करत असावेत यामागचे शास्त्रीय कारण कृषी कन्यांकडून सांगण्यात आले. वटवृक्ष जर पूर्ण वाढलेला असेल तर तो एका तासाला साधारण ७१२ किलो इतक्या जास्त प्रमाणात ऑक्सिजन वातावरणामध्ये सोडतो.वडाच्या झाडाखाली तुम्ही जितक्या जास्त वेळ बसता तितका जास्त वेळ तुमच्या शरीराला आवश्यक असा ऑक्सिजन तुम्हाला मिळतो. तसेच प्रत्येक फांदी, पारंबी आणि पानामधूनही नवीन वटवृक्ष जन्माला येतो. त्यामुळे याला अक्षयवट अस म्हणतात. यामुळेच वटपौर्णिमेला वडाचं पूजन केले जात असावं,याची माहिती उपस्थितांना देण्यात आली.तसेच वृक्षांचे महत्त्व सांगून वडाच्या झाडाचे वृक्षारोपण सरपंच सौ.दीपिका भोईटे यांच्या हस्ते करण्यात आले.

कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.यू. डी.चव्हाण सर, श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस. डी. निंबाळकर सर, कार्यक्रम अधिकारी प्रा.स्वप्नील लाळगे सर,प्रा.नितीशा पंडित मॅडम, समन्वयक प्रा.नीलिमा धालपे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली कु.प्रतिक्षा लोणकर, कु.अर्पिता पावणे, कु.अनुजा नाळे, कु.संजना वाघमारे, कु.मयुरी सावंत, कु. साक्षी अभंग, कु.भाग्यश्री बोडके यांनी कार्यक्रम पार पाडला.

# अखेर अकोला शहरासाठी जिगाव प्रकल्पातून २४ दलघमी जलसाठा आरक्षित



**अकोला :** शासनाने वान धरणातील पाणी आरक्षणाला स्थगिती दिल्यानंतर महापालिकेने 'अमृत अभियान'च्या टप्पा-२ अंतर्गतपाणीपुरवठायोजनेसाठी तयार केलेला ७३६ कोटींचा 'डीपीआर' रखडला होता. शासनाच्या सुकाणू समितीने पाण्याचा पर्यायी स्रोत शोधण्याचे निर्देश दिल्यानंतर मनपाने बुलढाणा जिल्ह्यातील जिगाव धरणातून पाणी आरक्षणासाठी धावाधाव सुरू केली होती. अखेर विदर्भ पाटबंधारे विकास मंडळाने जिगाव प्रकल्पातून २४.१३ दलघमी जलसाठ्याच्या आरक्षणावर २० जून रोजी शिक्कामोर्तब केले. यासंदर्भात भाजपचे प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सतत पत्रव्यवहार केला होता. शासनाच्या निर्णयामुळे महापालिकेला मोठा दिलासा मिळाला आहे.

अकोलेकरांना दैनंदिन पाणीपुरवठा करण्यासाठी 'अमृत अभियान' अंतर्गत केंद्र व राज्य शासनाने सन २०१७ मध्ये ११० कोटी रुपयांचा निधी वितरित केला होता. या निधीतून हद्दवाढ क्षेत्र वगळता शहरातील अंतर्गत जलवाहिन्यांचे सुमारे ४४५ किमीचे जाळे बदलणे तसेच आठ जलकुंभ उभारण्याचा समावेश होता. संबंधित कंत्राटदाराने आठपैकी सात जलकुंभांचे काम पूर्ण केले असून आठवा जलकुंभ अद्यापही उभारला नाही. यादरम्यान, मनपाने 'अमृत अभियान'च्या टप्पा-२ अंतर्गत प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यासाठी नागपूर येथील पुराणिक ब्रदर्स एजन्सीची नियुक्ती केली. २०१७ मध्ये मनपाने शहराची सन २०५५ पर्यंतची संभाव्य लोकसंख्या गृहीत धरून वान धरणातून २४ दलघमी जलसाठ्याचे आरक्षण निश्चित केले होते. तेल्हारा येथील शेतकऱ्यांचा विरोध पाहता तत्कालीन भाजप-शिवसेना युती सरकारच्या कालावधीत पाणी आरक्षणाला स्थगिती देण्यात आली होती. ही स्थगिती कायम असताना मनपाच्या निर्देशानुसार पुराणिक ब्रदर्स एजन्सीने वान धरणातील २४ दलघमी पाणी आरक्षण गृहीत धरून तब्बल ७३६ कोटी रुपयांचा प्रकल्प अहवाल तयार केला होता. या अहवालाला राज्याच्या तांत्रिक समितीने मंजुरी दिली होती. परंतु या धरणातील प्रस्तावित पाणी आरक्षणाला तत्कालीन शासनाने स्थगिती दिली असतानाही 'डीपीआर' तयार करण्याच्या मनपाच्या भूमिकेवर सुकाणू समितीने प्रश्नचिन्ह उपस्थित करीत पाण्याचा पर्यायी स्रोत शोधण्याचे निर्देश मनपा प्रशासनाला दिले होते.

**मनपाने दिला ४८ दलघमीचा प्रस्ताव**

सुकाणू समितीच्या निर्देशानंतर मनपा प्रशासनाने बुलढाणा जिल्ह्यातील नांदूरा तालुक्यात असलेल्या 'जिगाव' प्रकल्पातून ४८ दलघमी पाणी आरक्षणाचा प्रस्ताव पाटबंधारे विभागाकडे सादर केला होता. परंतु आरक्षणाच्या मुद्यावर पाटबंधारे बोट ठेवत हा प्रस्ताव बाजूला सारला. अखेर या संदर्भात आ.रणधीर सावरकर यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्रव्यवहार केला. त्यानंतर शासनाने २४.१३ दलघमीच्या जलसाठ्याला मंजूरी दिली.'जिगाव' प्रकल्पाचे काम अर्धवट

बुलढाणा जिल्ह्यातील 'जिगाव' प्रकल्पाला १९९६ मध्ये शासनाकडून प्रशासकीय मंजुरी मिळाली होती. यानंतर २७ वर्ष उलटूनही प्रकल्पाचे काम अपूर्ण आहे. हा प्रकल्प पूर्ण होण्यास आणखी किती कालावधी लागेल याबाबत निश्चिती नाही. अशावेळी शासनाने आरक्षित केलेल्या पाण्याचा वापर महापालिका कधी करणार, याकडे शहरवासियांचे लक्ष लागले आहे.

# राजकीय स्टंटबाजीने 'पंचगंगा शुद्धीकरण' गढूळ; नुसता आवाज उठवायचा, प्रत्यक्षात पाठपुरावा नाहीच

**इचलकरंजी :** खासदार धैर्यशील माने यांनी पंचगंगानदीमध्येउतरून 'नमामि पंचगंगा' असा नारा देतनदीप्रदूषणाबद्दलआवाज उठविला. त्यापाठोपाठ आमदार प्रकाश आवाडे यांनीही नदीप्रदूषणाचाप्रश्न सोडविण्यासाठी पाठपुरावा सुरू असल्याचे दाखवले. परंतु गेल्या पाच वर्षात प्रत्यक्षात नदी प्रदूषणाबाबत ठोस उपाययोजना झाल्याच नाहीत. त्यामुळे शहरवासीयांच्या उशाला नदी असताना शुद्ध व मुबलक पाण्यासाठी गावोगाव भटकावे लागत आहे. याच मुद्द्यावरून अनेक गावांमधून इचलकरंजीला पाणी देण्यासाठी विरोधही होत आहे.

पंचगंगा नदी प्रदूषित झाल्याने इचलकरंजी शहरवासीयांनी सन २००१ साली कृष्णा पाणी योजना राबवली. ४५ दशलक्ष लिटर उपसा असलेल्या या योजनेतून सध्या ३६ द.लि. पाणी शहरामध्ये पोहोचते. त्याचबरोबर पंचगंगा नदीवरील जुन्या सन १९६५ च्या योजनेतून नऊ ते बारा दशलक्ष लिटर पाणी मिळते. दोन्ही योजनेतून मिळणारे ४२ ते ४५ दशलक्ष लिटर पाणी शुद्धीकरण करून दोन ते चार दिवसाआड शहरवासीयांना पुरवले जाते. हे पाणी पुरत नसल्याने सन २०५० सालची लोकसंख्या गृहीत धरून नव्याने ६९ दशलक्ष लिटरची योजना राबविण्याचा निर्णय घेत सध्या सुळकूड-दूधगंगा योजनेतून पाणी आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. परंतु या योजनेलाही विरोध होत आहे.

पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी पंचगंगा नदी शुद्धीकरण करून गैबी बोगद्याद्वारे येणारे काळम्मावाडीचे शुद्ध पाणी शहरासाठी घ्या अथवा जुनी कृष्णा योजना बळकट करून तेथून कृष्णेचे पाणी घ्या, असा प्रस्ताव मांडला. त्यावर कृष्णा नदीत पंचगंगा नदीचे पाणी ज्याठिकाणी मिसळते, तेथून काही अंतरावरून इचलकरंजीचे मजरेवाडी उपसा केंद्र आहे. त्यामुळे शहराला सध्या पंचगंगेचे प्रदूषित पाणी मिळत असल्याचे शहरातील प्रतिनिधींनी सांगितले. त्यावर मुश्रीफ यांनी शिरटी येथून उपसा करण्याचा सल्ला दिला. ही माहिती समजताच शिरटीहून ही विरोध सुरू झाला.

हा सर्व खटाटोप पंचगंगा नदी प्रदूषित असल्याने सुरू आहे. शहरालगत पंचगंगा नदी असताना फक्त ती प्रदूषित झाली असल्याने अन्य गावांतून दुसऱ्या नदीतील पाणी आणण्यासाठी जंग जंग पछाडावे लागत आहे. त्यात लोकप्रतिनिधींचे राजकारण घुसल्याने विरोधाला विरोध सुरू झाला आहे. या प्रदूषणाला इचलकरंजी कारणीभूत असल्याने ग्रामीण भागांतून विरोधाला जोर लागला आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून योजना राबवून दुसऱ्या नदीतून पाणी आणायचे आणि ते प्रदूषित करून पंचगंगा नदीत सोडायचे आणि ग्रामीण भागातील जनतेने प्रदूषित पाणी प्यायचे हा प्रकार योग्य नाही, अशी भावनाही ग्रामीण भागांतून व्यक्त होते.

जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींनी पंचगंगा नदी शुद्धीकरणासाठी एकत्रित आणि प्रामाणिक प्रयत्न केल्यास नदी प्रदूषण रोखणे शक्य आहे. संपूर्ण पंचगंगा नदीकाठावरील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटेल. तसेच शेतीला आणि जनावरांनाही शुद्ध पाणी मिळेल. पण त्यासाठी राजकारण विरहित चळवळ राबवावी लागेल.-ऊाएठढ्खडएचएछ्ढझुशीशव लूमहापालिकेच्या उपाययोजनाही तोकड्या

महापालिकेने शहरातील निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर चाप लावण्यासाठी नळाला तोट्या बसवणे, यासारख्या कोणत्याच ठोस उपाययोजना केल्या नाहीत.

# शक्तिपीठ महामार्गावरुन धैर्यशील मानेंचा सरकारला घरचा आहेर

राज्यातील बारा जिल्ह्यांतून जाणाऱ्या नागपूर-गोवा शक्तीपीठ महामार्गाला सर्वच स्तरातून प्रचंड विरोध सुरु झाला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनीही विरोध सुरू केला आहे. आज सांगली जिल्हा काँग्रेस पक्षाकडून आंदोलन केले आहे. जिल्हाधीकारी कार्यालयात याबाबत निवेदन दिले. यावेळी शिंदे गटाचे खासदारधैर्यशील मानेउपस्थित होते. यावेळी बोलताना त्यांनी शक्तिपीठ महामार्गाला विरोध केला. यामुळे आता खासदारधैर्यशील मानेयांनी शिंदे-फडणवीस सरकारला घरचा आहेर दिल्याची जोरदार चर्चा आहे.

:'माझं करिअर संपवणं जनतेच्या हातात'; मनोज जरांगेवर छगन भुजबळ संतापलेयावेळी बोलताना खासदार धैर्यशील माने म्हणाले, 'शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्यासाठी मुख्यमंत्र्यांना भेटूच. पण संसदेमध्ये सुद्धा याबाबत आवाज उठवू. देवांच्या नावाखाली आमच्या घरावर कोणी



नांगर फिरवत असेल तर देव सुद्धा त्याला माफ करणार नाही', असंही धैर्यशील माने म्हणाले. 'शक्तिपीठ'ला शेतकऱ्यांचा विरोधराज्यातील बारा जिल्ह्यांतून जाणाऱ्या नागपूर-गोवा शक्तीपीठ महामार्गाला सर्वच स्तरातून प्रचंड विरोध सुरु झाल्याने याच्या भूसंपादनाला राज्य सरकारने नुकतीच स्थगिती देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, हा महामार्ग शेतकऱ्यांच्या मुळावर उठणारा असल्याने स्थगितीपेक्षा हा महामार्गच कायमचा रद्द करण्याची मागणी जोर धरत आहे. विधानसभेच्या तोंडावर तात्पुरती स्थगिती देऊन राज्य सरकार शेतकऱ्यांची फसवणूक तर करत नाही ना? अशी भीती व्यक्त करत या महामार्गाविरोधातील लढा अधिक तीव्र करण्यासाठी शक्तीपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीने कंबर कसली आहे.नागपूर-गोवा हा प्रस्तावित ८०२ कि.मी.चा शक्तीपीठ महामार्ग राज्यातील १२ जिल्ह्यांतून जाणार असून यामध्ये २७ हजार ५०० हेक्टर जमिनीचे भूसंपादन केले जाणार आहे. या महामार्गात पिकाऊ जमीन जाणार असल्याने याविरोधात राज्यभरात आंदोलनाचे लोन उसळले आहे. ऐन विधानसभेच्या तोंडावर महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी याविरोधात आवाज उठवल्याने आता महायुतीचे लोकप्रतिनिधीही या महामार्गाविरोधात उघडपणे बोलू लागले आहेत.मुख्यमंत्र्यांनी केले ट्विटमुख्यमंत्र्यांनी केलेल्या ट्विट असे म्हटले आहे की, हे सरकार सर्वसामान्य जनतेचे आहे. त्यामुळे जनतेच्या भावनेचा विचार करुनच तसेच त्यांना विश्वासात घेऊनच प्रकल्प पुढे नेला जाईल. कुठलाही प्रकल्प जनतेवर थोपणार नाही अथवा रेटून नेणार नाही. समृध्दी महामार्ग हा गेमचेंजर प्रकल्प आम्ही जनतेला विश्वासात घेऊनच पूर्ण केला. त्यानुसार या शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पात ज्या ठिकाणी विरोध आहे त्याची फेरआखणी करता येईल का, याचाही विचार करीत आहोत. मात्र जनतेला विश्वासात घेतल्याशिवाय कुठलाही प्रकल्प पुढे नेणार नाही.

# फलटण तालुक्याच्या पूर्वभागातील प्राथमिक, माध्यमिक शाळांमध्ये जागतिक योग दिन साजरा



**फलटण :** फलटण तालुक्याच्या पूर्व भागातील राजाळे, मिंडवस्ती, गोखळी, पवारवाडी, खटकेवस्ती, आसू येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये २१ जून जागतिक योग दिनानिमित्त इयत्ता बारावीमधील विद्यार्थिनींनी ताल योग याचे सादरीकरण केले.


तालुक्याच्या पूर्व भागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कारप्राप्त श्रीराम एज्युकेशन सोसायटीच्या जानाई हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये योग प्रशिक्षक गजानन काळेबेरे व गौतम भोसले यांनी योगासनांची विविध प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांसमोर करून दाखवली व विद्यार्थ्यांकडून योगासने करून घेतली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निळकंठ निंबाळकर सर यांनी केले. प्राचार्या सौ. गायकवाड यांनी योगदिनाच्या निमित्ताने सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना सर्वांना शुभेच्छा दिल्या. तसेच नियमित योगासने व प्राणायाम आपल्या आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे, याविषयी माहिती दिली.

यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. गोखळी येथील हनुमान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये जागतिक योग दिनाच्या निमित्ताने विद्यालयातील उपशिक्षक किरण पवार सर, सुनील जाधव सर यांनी योगासने व प्राणायाम आरोग्यासाठी महत्त्वाचे असून ते नियमितपणे करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करून योगासने आणि प्राणायामाची प्रात्यक्षिके सादर केली.

पूर्व भागातील ज्योतिर्लिंग हायस्कूल पवारवाडी, सरलष्कर खर्डेकर विद्यालय आसू, हणमंतवाडी माध्यमिक विद्यालय आणि पवारवाडी, ढवळेवाडी, मिंडवस्ती (साठे), जाधववाडी, खटकेवस्ती, पंचबिघा, जगतापवस्ती, शांतीदासनगर येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये जागतिक योग दिनाच्या निमित्ताने योगासने आणि प्राणायाम प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांसमोर सादर करण्यात आली.

# बांबू लावगडीसाठी अभ्यास दौऱ्यांचे आयोजन



**सातारा :** बांबू लागवडीच्या प्रशिक्षणासाठी जिल्हा परिषदेच्या कृषि विभागाच्या वतीने ५५ शेतकरी व ५ कृषि अधिकारी यांना दापोली येथे प्रशिक्षण व अभ्यास दौ-यासाठी पाठविण्यात आले. सातारा:सातारा जिल्हयामध्ये बांबू लागवडीची मोहीम गेल्या वर्षापासून चालू असून त्यास शेतक-यांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. शेतक-यांना बांबू लागवडीचे तांत्रिक मार्गदर्शन करणेसाठी डॉ. बाबासाहेब सावंत कृषि विदयापीठ दापोली येथे बांबू लागवडीबाबतचे प्रशिक्षणाचे आयोजन केले आहे. बांबू लागवडीच्या प्रशिक्षणासाठी जिल्हा परिषदेच्या कृषि विभागाच्या वतीने ५५ शेतकरी व ५ कृषि अधिकारी यांना दापोली येथे प्रशिक्षण व अभ्यास दौ-यासाठी पाठविण्यात आले.जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष हराळेसर व कृषी विकास अधिकारी विजय माईनकर यांच्या उपस्थितीमध्ये सर्व प्रशिक्षणार्थींना रवाना केले.



# पुणे - सातारा विना वाहक, विना थांबा बसचा प्रवास म्हणजे प्रवाशांसाठी मुकी बिचारी कोणी हाका

सातारा..२३ उशिरा जाईन ,पण एसटीने जाईन असे काही ब्रीद वाक्य कायमस्वरूपी बिंबवलेल्या सामान्य सातारकरांना मात्र पुणे सातारा हा तब्बल दोन तासाचा विना वाहक बसा प्रवास मात्र अक्षरशः काही वेळेला नकोसा होत आहे .

शनिवारी सायंकाळी पावणे सात वाजता सुटलेल्या सातारा ते स्वारगेट या विना वाहक बसचा असाच काहीसा प्रवास पडला आणि तो म्हणजे पूर्ण झाला सुमारे साडेतीन तासानंतर.

सातारा बस स्थानकातून पावणेसातला सुटलेल्या एम एच १४ /ज्ञ्ॅ८०२० या बसने पुणे बेंगलोर हायवे ला प्रवासाला सुरुवात केली आणि अचानक धाप लागल्यासारखी ही बस जागेवरच बंद पडली हायवे वर डी मार्ट जवळ या बस मधले प्रवासी अक्षरशः ताटकळले आणि चालकाच्या विनंतीवरून अखेर बस बाहेर येऊन बसले .सात वाजता रस्त्यावर येऊ घातलेल्या बसची वाट पाहत या प्रवाशांना तब्बल सव्वा तास ताटकळावे लागले रस्त्यावरच आणि मग अंधारातच बस स्थानकातून सोडण्यात आलेल्या दुसऱ्या बसचा अक्षरशः पाठलाग करत ही बस कधी चालू कधी बंद होत डी मार्ट च्या पुढे जाऊन थांबली आणि अखेर या सर्व प्रवाशांनी सुटकेचा निश्वास सोडला आणि त्यानंतर ही बस सुमारे दहा वाजता स्वारगेट बस स्थानकात पोहोचली.

एकीकडे लोकांना लवकरात लवकर हा प्रवास सहज सोपा आणि सुलभ हवा यासाठी ही विनावाहक आणि विना थांबा बस सुरू केली असली तरी नव्या बसेस ज्या इलेक्ट्रिक पद्धतीने बांधण्यात आलेल्या आहेत, त्या चालकांना त्यातील काहीच कळत नसल्यामुळे ही बस जागेवरच बंद पडल्यानंतर दुरुस्तीसाठी आगारातून मेकॅनिक आल्याशिवाय काहीच उपाय होऊ शकत नाही वस्तुतः जे नोकरदार आहेत त्यांना आठवडाभराचा शिणवठा काढण्यासाठी पुणे गाठणे आणि लवकरात लवकर घरी पोहोचणे महत्त्वाचे असताना अशा पद्धतीने आलेली ही प्रवासाची आगळी वेगळी कथा मात्र अनेकांना अक्षरशः ऐन पावसाळ्यात घाम फोडणारी ठरली होती त्यामुळे सातारा आगाराने आता तरी आपला स्टाफ कार्य कुशल पणे तत्परतेने सांभाळत अशा मोडकळीला आलेल्या बसेस किंवा याबाबतच्या दुरुस्त्या त्वरेने करून पावसाळ्याचा हंगाम तरी प्रवाशांना सहज सोपा करावा असे म्हणावेसे वाटते.

# लोकमान्य मेडिकल फाउंडेशनच्या माध्यमातुन ग्रामिण भागात रुग्नाना सेवा भेटणार : विलासराव नलवडे



**आदर्की :** कापशी गावचे सुपुत्र डॉ . बी .के . यादव यांनी गेले तीस वर्ष शहरात रुग्नाना प्रामाणिक पणे सेवा देत आहेत त्यांनी लोकमान्य फॉडेशनच्या माध्यमातुन ग्रामीण भागात त्यांनी सेवा सुरू करून सामाजिक बांधिलकी जपली आहे दवाखान्यामुळे ग्रामिण भागात दर्जेदार सेवा मिळणार असल्याचे संतकृपा उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष विलासराव नलवडे यांनी सांगितले.

आळजापुर - कापशी फाट्यावर लोकमान्य मेडिकल फॉडेशनच्या माध्यमातुन डॉ बी. के. यादव यांच्या मार्गदर्शनाखाली दवाखाना सुरू केला आहे. त्याचे उदघाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी रुग्नाची रक्त लघवी आदी आजाराची मोफत तपासणी करण्यात आली.

यावेळी डॉ. यादव म्हणाले, कापशी - आळजापुर आमची जन्मभूमी आहे मी फलटण शहरात ३० वर्ष रुग्नाना सेवा देण्याचे काम केले आता शासन आपल्या दारी प्रमाणे लोक मान्य मेडिकल फॉडेशनच्या माध्यमातून कापशी - आळजापुर फाट्यावर डॉ. आमित मोरे हे रुग्नावर उपचार करणार आहेत तरी सर्वांनी सहकार्य करावे.

यावेळी लोकमान्य उद्योग समुहाचे अध्यक्ष डॉ बी के . यादव, डॉ अमित मोरे, आळजापुरचे पोलीस पाटील शंकरराव नलवडे, जयवंत, महेंद्र कदम, कापशीच्या सरपंच पुनमताई राशिनकर, चेअरमन विजय मोटे, माजी चेअरमन रविंद्र कदम, कापशीचे पोलीस पाटील नितीन जाधव आदी ग्रामस्य उपस्थित होते.

सर्वांचे आभार जगताप यांनी मानले.


# कोळकी येथे एकास धारदार शस्त्रांनी वार करून लुटले



**फलटण :** कमिन्स कंपनी, सुरवडी येथून कामावरून मोटारसायकल (क्र. एमएच-१४-जेएफ-२३५५) वरून घरी येत असताना अभिषेक विठ्ठल गुंजवटे (वय २४, रा. झिरपवाडी, ता. फलटण) यांना २० जून रोजी रात्री १०.३० वाजण्याच्या सुमरास कोळकी येथील महाराजा बझार येथे पाठीमागून मोटार सायकलवरून येवून चौघांनी त्यांच्यावर धारदार शस्त्रांनी वार करून लुटल्याची घटना घडली आहे. चोरट्यांनी केलेल्या मारहाणीत अभिषेक गुंजवटे हे जखमी झाले असून त्यांच्याकडील मोबाईल, हातातील सोन्याची अंगठी हिसकावून नेली आहे. यावेळी चोरट्यांनी गुंजवटे यांना लाथाबुक्क्यांनी, दगडानेही जबर मारहाण केली असून या प्रकरणी फलटण शहर पोलीस स्टेशन चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गोट्या फडतरे, शुभम धुमाळ, संदीप हुंबे (तिघे राहणार धुमाळवाडी, ता. फलटण), नवनाथ सूर्यवंशी (रा. सोनवडी, ता. फलटण) अशी संशयित आरोपी चोरट्यांची नावे आहेत. या प्रकरणी अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक दातीर करत आहेत.

# अडीच कोटी सूर्य नमस्काराचा विक्रम



**कोपरगाव :** विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट संचलित, आत्मा मालिक शैक्षणिक व क्रिडा संकुलातील ७ हजार २०० विद्यार्थी व शिक्षकांनी दररोज १२ सूर्यनमस्कार केले. या प्रमाणे २१ जून २०२३ ते ३१ मार्च २०२४ पर्यंत २ कोटी ४७ लाख ९९ हजार ६९२ सूर्यनमस्कार पूर्ण केले असून या विक्रमाची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स व एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स यांनी घेतली आहे. या विक्रमाबाबतची अधिकृत उद्घोषणा शुक्रवारी (दि. २१) जागतिक योग दिनाच्या दिवशी एशिया बुक ऑफ रेकॉर्डचे अधिकारी अशोक आदक यांनी केली.

या विक्रमाची नोंद झाल्याबद्दलचे प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह यावेळी अधिकारी अशोक आदक यांनी आत्मा मालिक शैक्षणिक संकुलाला बहाल केले. यावेळी संत परमानंद महाराज, संत चंद्रानंद महाराज, संत मांदियाळी, ट्रस्टचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, सरचिटणीस हनुमंतराव भोंगळे, विश्वस्त प्रकाश भट, प्रकाश गिरमे, बाळासाहेब गोर्डे, विष्णुपंत पवार, प्रभाकर जमधडे, विठ्ठलराव होन, जाधव भाई पावसिया आदी उपस्थित होते.